महाराष्ट्र शासन

क्रमांक: पावामा-२०१७/प्र.क्र.१५६/ऊर्जा-४
उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-३२
दूरध्वनी क्र. ०२२-२२८८३४१५
दिनांक:- १२ एप्रिल, २०१८

विषय : महापारेषण कंपनीशी संबंधित असलेल्या पारेषण नवीन पारेषण वाहिन्या उभारण्यासाठी विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम ६८ अन्वये शासनाची पूर्व परवानगी देणेबाबत.

संदर्भ : संचालक (प्रकल्प) महापारेषण कंपनी, यांचे पत्र क्र. मराविपाकंम / सांका /पा.प्र/ ३७९१, दि. ११.०४.२०१७

आदेश

मला उपरोक्त विषयाशी संबंधित महापारेषण कंपनीच्या संदर्भीय पत्राच्या अनुषंगाने, असे कळविण्याचे आदेश आहेत की, महापारेषण कंपनीने मंजूर केलेल्या व सोबतच्या परिशिष्टातील (परिशिष्ट अ,ब,क) विवरण पत्रात नमूद केलेल्या योजना अंतर्गत पारेषण वाहिन्या उभारण्यासाठी व उभारुन ठेवण्यासाठी विद्युत कायदा, २००३ च्या कलम ६८ अन्वये पुढे नमूद केलेल्या अटींच्या अधिन राहून शासन मान्यता देण्यात येत आहे.

१. वीज वाहिन्यांची उभारणी (प्रकरणपरत्वे) महापारेषण कंपनी अथवा संबंधित खाजगी वीज निर्मिती प्रकल्पधारक स्वखर्चाने विहित केलेल्या प्रमाणित पद्धतीने आणि तज्ञांच्या मार्गदर्शनाखाली व पर्यवेक्षणाखाली करेल. तसेच संबंधित खाजगी वीज निर्मिती प्रकल्पधारक पारेषण वाहिन्या उभारणीचे कामे पूर्ण झाल्यानंतर पारेषण वाहिन्या संचलन व सुव्यवस्था कामासाठी महापारेषण कंपनीकडे हस्तांतरीत करेल.

२. वीज वाहिन्यांचे संचलन व सुव्यवस्था महापारेषण कंपनी स्वत: करेल.

३. वीज वाहिन्यांचा वापर महापारेषण कंपनी अथवा संबंधित ग्राहक यांनी ज्या प्रयोजनार्थ करावयाचा ठरविलेला आहे केवळ त्याच प्रयोजनासाठी करणे महापारेषण कंपनीवर वा संबंधित ग्राहकावर बंधनकारक असेल.

४. वीज वाहिन्या कार्यान्वित करण्यापूर्वी / प्रभारीत करण्यापूर्वी याबाबतच्या सक्षम प्राधिकाऱ्याकडून पूर्वपरवानगी घेणे आवश्यक असेल.

५. वीज वाहिन्या उभारतांना वा उभारल्यानंतर संबंधित जागा मालकांच्या / शेतकऱ्यांच्या जर काही तक्रारी असल्यास, सक्षम प्राधिकाऱ्यांसमवेत विचार विनिमय करुन त्या तक्रारींचे यथायोग्यरित्या निराकरण करणे ही जबाबदारी महापारेषण कंपनीची अथवा संबंधित ग्राहकाची असेल.

६. सदरहू वीज वाहिनी उभारणे व उभारुन ठेवणे या अनुषंगाने आवश्यक असलेले सर्व परवाने मिळविणे, विहित केलेल्या निकषांची पूर्तता करणे तसेच शासनाचे विविध प्राधिकरण / विभाग/वीज नियामक आयोग, भार प्रेषण केंद्र इ. चे इतर प्रचलित नियम त्याप्रमाणे शासनाने वेळोवेळी मंजूर केलेले नियम व अटी कंपनीवर बंधनकारक राहतील.

७. विद्युत कायदा, २००३ च्या कलम ६८ मधील अटी व शर्ती व त्यात वेळोवेळी होणारे बदल, तसेच या विभागाचा शासन निर्णय क्र. धोरण-२०१६/प्र.क्र.५२०/ऊर्जा-४, दिनांक ३१.०५.२०१७ मधील अटी व शर्ती तसेच राज्य शासन व केंद्र शासनाची अति उच्चदाब पारेषण वाहिन्यां संबंधीची वेळोवेळी जाहीर झालेली / होणारी मार्गदर्शक तत्वे व धोरणे सदरहू पारेषण वाहिन्यास लागू राहतील.

८. सदरहू परवान्याचा कालावधी परवानापत्र दिल्यापासून २५ वर्षाचा असेल, तद्नंतर सदरहू परवानगी आपोआप संपुष्टात येईल.

सदर आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharshtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१८०४१२१२४८३८५७१० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Bhimashankar Yallappa Manta

Digitally signed by Bhimashankar Yallappa Manta
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Industries,Energy And Labour Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=873ce9a279d9561ff0cbf658e05b823c67c79dcac309fc4ebdac035d6aeec2a0, cn=Bhimashankar Yallappa Manta
Date: 2018.04.12 12:50:36 +05'30'

(भि.य. मंता)

उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

व्यवस्थापकीय संचालक,
महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्या.
प्रकाशगंगा, वांद्रे-कुर्ला संकुल, वांद्रे (पुर्व)
मुंबई - ४०० ०५१

प्रत,

संचालक (प्रकल्प), महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्या., प्रकाशगंगा, वांद्रे-कुर्ला संकुल, वांद्रे (पुर्व), मुंबई - ४०० ०५१

आदेश क्रमांक: पावामा-२०१७/प्र.क्र.१५६/ऊर्जा-४ दिनांक १२.०४.२०१८ सोबतचे विवरणपत्र

परिशिष्ट-अ

महापारेषण कंपनीने त्यांच्या योजनेअंतर्गत मंजूर केलेले प्रकल्प

अ.क्र.	योजनेचा तपशील	योजने अंतर्गत असलेल्या वाहिनीचा तपशील	मान्यता क्र. व दिनांक
१	जळगाव जिल्ह्यातील २२०/१३२ के.व्ही. विरोदा उपकेंद्राची उभारणी करणे.	(i) २२० के.व्ही. दिपनगर-अमळनेर परिपथ-II लिलो करून २२० के.व्ही. द्विपथ वाहिनीची द्विपथ मनो-यावर उभारणी करणे - ३.५ कि.मी.	बी.आर क्र.११०/१२ दि.२८.०७.२०१६
		(ii) १३२ के.व्ही. यावल उपकेंद्रापासून ते प्रस्तावित २२० के.व्ही. विरोदा उपकेंद्रापर्यंत १३२ के.व्ही. दुहेरी परिपथ वाहिनीची दुहेरी परिपथ मनो-यावर उभारणी करणे - १६ कि.मी.	
		(iii) १३२ के.व्ही. सावदा उपकेंद्रापासून ते प्रस्तावित २२० के.व्ही. विरोदा उपकेंद्रापर्यंत दुहेरी परिपथ वाहिनीची दुहेरी परिपथ मनो-यावर उभारणी करणे - ५.५ कि.मी.	
२	जालना जिल्ह्यातील २२०/१३२/३३ के.व्ही. जालना (नागेवाडी) उपकेंद्र उभारणीच्या कामास पुर्नमंजूरी	(i) ४०० के.व्ही. औरंगाबाद-II उपकेंद्रापासून ते प्रस्तावित २२० के.व्ही. जालना (नागेवाडी) उपकेंद्रापर्यंत २२० के.व्ही. दुहेरी परिपथ वाहिनीची दुहेरी परिपथ मनो-यावर उभारणी करणे-४० कि.मी.	बी.आर क्र.११०/११ दि.२८.०७.२०१६
		(ii) अस्तित्वात असलेल्या २२० के.व्ही. वालूज-जालना दुहेरी परिपथ वाहिनी एकेरी परिपथला लिलो करून २२० के.व्ही. द्विपथ परिपथ वाहिनीची द्विपथ मनो-यावर उभारणी करणे-१५ कि.मी.	
		(iii) १३२ के.व्ही. जालना (जुने) –जाफराबाद वाहिनी लिलो करून १३२ के.व्ही. द्विपथ वाहिनीची द्विपथ मनो-यावर उभारणी करणे-१५ कि.मी.	
		(iv) अस्तित्वात असलेल्या १३२ के.व्ही. जालना (एमआयडीसी) - २२० के.व्ही. जालना एकेरी परिपथला लिलो करून १३२ के.व्ही. दुहेरी परिपथ वाहिनीची दुहेरी परिपथ मनो-यावर उभारणी करणे-०.५ कि.मी.	
३	दिल्ली, मुंबई औद्योगिक मार्गिका अंतर्गत २२०/३३ के.व्ही. GIS शेंद्रा उपकेंद्राची औरंगाबाद जिल्ह्यामध्ये उभारणी करणे.	२२० के.व्ही. औरंगबाद (पॉवरग्रीड)- शेंद्रा वाहिनीचा एकेरी परिपथ लिलो करून २२० के.व्ही. दुहेरी परिपथ वाहिनीची दुहेरी परिपथ मनो-यावर उभारणी करणे- ८ कि.मी.	बी.आर क्र.११०/१३ दि.२८.०७.२०१६
४	यवतमाळ जिल्ह्यातील २२० के.व्ही. देऊळी (पॉवर ग्रीड) – घाटोडी वाहिनी लिलो करुन २२० के.व्ही. यवतमाळ उपकेंद्रापर्यंत उभारणे करणे.	२२० के.व्ही. देऊळी (पॉवर ग्रीड) –घाटोडी वाहिनीवर लिलो करुन द्विपथ मनोऱ्यावर दुहेरी परिपथ वाहिनीची २२० के.व्ही. यवतमाळ उपकेंद्रापर्यंत उभारणे करणे – ११ कि.मी.	बी.आर क्र.१११/०७ दि.२७.०९.२०१६
५	मुंबई महानगर मध्ये, २२० के.व्ही. बोईसर-बोरिवली (II) लिलो करून ४०० के.व्ही. बोईसर (पॉवरग्रिड) उपकेंद्रापर्यंत उभारणी करणे.	२२० के.व्ही. बोईसर-बोरिवली (II) लिलो करून २२० के.व्ही. द्विपथ वाहिनीची बहुपथ मनो-यावर ४०० के.व्ही. बोईसर (पॉवरग्रिड) उपकेंद्रापर्यंत उभारणी करणे - १ कि.मी.	बी.आर क्र.११२/१६ दि.१७.११.२०१६

६	जळगाव जिल्ह्यातील २२०/३२/३३ के.व्ही. केकटनिंभोरा उपकेंद्राची उभारणी करणे	(i) अस्तित्वात असलेल्या २२० के.व्ही. खडका-चालिसगाव दुहेरी परिपथ लिलो करून २२० के.व्ही. द्वपथ वाहिनीची द्विपथ मनो-यावर उभारणी करणे- ०.५ कि.मी. (ii) १३२ के.व्ही. पहुर उपकेंद्रापासून ते प्रस्तावित केकटनिंभोरा उपकेंद्र पर्यंत वाहिनीची दुहेरी परिपथ मनो-यावर उभारणी करणे- २० कि.मी.	बी.आर क्र.११२/२२ दि.१७.११.२०१६
७	मुंबई पारेषण प्रणाली सक्षमीकरण योजना अंतर्गत २२० के.व्ही. वाहिनीची ४०० के.व्ही. कुडूस उपकेंद्रा पर्यंत उभारणी करणे	(i) २२० के.व्ही. तरापूर-बोरिवली द्विपथ वाहिनीवर लिलो पध्दतीने २२० के.व्ही. द्विपथ वाहिनीची उभारणी करणे – २७ कि.मी. (ii) २२० के.व्ही. बोईसर-घोडबंदर द्विपथ वाहिनीवर लिलो पध्दतीने २२० के.व्ही. द्विपथ वाहिनीची उभारणी करणे – २७ कि.मी.	बी.आर क्र.११२/२५ दि.१७.११.२०१६
८	अमरावती जिल्ह्यातील २२० के.व्ही. नांदगाव पेठ उपकेंद्राला, १३२ के.व्ही. स्तर उभारणी करणे.	अस्तित्वात असलेल्या १३२ के.व्ही. अमरावती-मोर्शी एकपथ वाहिनीवर लिलो पध्दतीने १३२ के.व्ही. द्विपथ वाहिनीची उभारणी करणे- ७ कि.मी.	बी.आर क्र.११२/२९ दि.०२.१२.२०१६
९	४०० के.व्ही. परळी (पॉवरग्रीड) उपकेंद्रामध्ये, २२० के.व्ही. परळी-उस्मानाबाद वाहिनी लिलो पध्दतीने उभरणी करणे	(i) २२० के.व्ही. परळी-हरंगुळ द्विपथ वाहिनीवर लिलो पध्दतीने २२० के.व्ही. द्विपथ वाहिनीची उभारणी करणे – १२.६३१ कि.मी. (ii) २२० के.व्ही. परळी-उस्मानाबाद द्विपथ वाहिनीवर लिलो पध्दतीने बहुपथ वाहिनीची उभारणी करणे –२.२८३ कि.मी.	बी.आर क्र.११३/१० दि.२७.१२.२०१६
१०	नंदूरबार जिल्ह्यातील १३२/३३ के.व्ही. धाडगाव उपकेंद्र उभारणीबाबत	१३२ के.व्ही. तळोदा उपकेंद्रापासून प्रस्तावित १३२ के.व्ही. धाडगाव उपकेंद्रापर्यंत १३२ के.व्ही. दुहेरी परिपथ वाहिनीची दुहेरी परिपथ मनोऱ्यावर उभारणी करणे – ४० कि.मी.	बी.आर क्र.१०९/०६ दि.२१.०६.२०१६
११	नागपूर जिल्ह्यातील १३२/३३ के.व्ही. (Hybrid) जत-तरोडी उपकेंद्र उभारणीबाबत.	१३२ के.व्ही. पारडी उपकेंद्र ते १३२ के.व्ही. जत तरोडी उपकेंद्रापर्यंत १३२ के.व्ही. भूमिगत केबल टाकणे – १० कि.मी.	बी.आर क्र.१०८/२८ दि.०२.०६.२०१६
१२	सांगली जिल्ह्यातील विश्रामबाग बोरगाव एकेरी परिपथ वाहिनीच्या आष्टा येथील ११० के.व्ही. टॅप चे लिलो मध्ये परिवर्तन करुन सदर एकेरी परिपथ वाहिनीऐवजी दुहेरी परिपथ वाहिनी तयार करणे.	११० के.व्ही. आष्टा उपकेंद्रात ११० के.व्ही. टॅप चे लिलो मध्ये परिवर्तन करणे – १.७४ कि.मी.	Dir. (Proj)-६५२ दि. २८.०४.२०१६
१३	पुणे जिल्ह्यातील १३२ के.व्ही. गणेशखिंड उपकेंद्राला १३२ के.व्ही. रहाटणी उपकेंद्राकडून अतिरिक्त स्त्रोत पुरवणे	१३२ के.व्ही. रहाटणी उपकेंद्रासाठी १३२ के.व्ही. गणेशखिंड-पवनानगर वाहिनीवर लिलो पध्दतीने एकेरी परिपथावर दुहेरी परिपथ वाहिनी उभारणे - ०.१ कि.मी.	Dir. (Proj)-७५५ दि. १०.०५.२०१६
१४	नाशिक (एकलहरे) येथे ४००/२२० के.व्ही. जीआयएस उपकेंद्र उभारणीबाबत.	(i) ४०० के.व्ही. सिन्नर IPP ते प्रस्तावित ४०० के.व्ही. नाशिक (एकलहरे) GIS उपकेंद्रापर्यंत ४०० के.व्ही. द्विपथ वाहिनीची उभारणी करणे – ३० कि.मी. (ii) २२० के.व्ही. एकलहरे (GCR) बाभळेश्वर द्विपथ वाहिनी आणि २२० के.व्ही. एकलहरे ते प्रस्तावित ४०० के.व्ही. नाशिक GIS उपकेंद्रामधील २२० के.व्ही. द्विपथ वाहिनीवर लिलो करण्यासाठी २२० के.व्ही. बहु परिपथ वाहिनीची उभारणी करणे – ५ कि.मी. (iii) OCR नाशिक ते GCR नाशिक २२० के.व्ही.चा भूमिगत केबल टाकणे – १.० कि.मी.	बी.आर क्र.१०९/०७ दि.२१.०६.२०१६

		(iv) ४०० के.व्ही. नाशिक GIS उपकेंद्र आणि २२० के.व्ही. बाभळेश्वर उपकेंद्रामधील २२० के.व्ही. द्विपथ वाहिनीवर OPGW वाहिनी उभारणे – ७५ कि.मी. (v) २२० के.व्ही. CGR ते ४०० के.व्ही. नाशिक एकलहरे GIS उपकेंद्रामधील २२० के.व्ही. द्विपथ वाहिनी काढून टाकणे – ५ कि.मी.	
१५	पालघर जिल्ह्यातील १३२/३३ के.व्ही. जव्हार उपकेंद्र उभारणीबाबत	१३२ के.व्ही. सूर्यनगर उपकेंद्र आणि १३२ के.व्ही. कवडस उपकेंद्रापासून १३२ के.व्ही. जव्हार उपकेंद्रापर्यंत १३२ के.व्ही. दुहेरी परिपथ वाहिनीची दुहेरी परिपथ मनोऱ्यावर उभारणी करणे – ४० कि.मी.	बी.आर क्र.१११/०६ दि.२७.०९.२०१६
१६	चंद्रपूर जिल्ह्यातील जीएमआर एनर्जी लि. (TPP) ते ४०० के.व्ही. वरोरा उपकेंद्रापर्यंत ४०० के.व्ही. दुहेरी परिपथ वाहिनीची दुहेरी परिपथ मनोऱ्यावर उभारणी करणे	जीएमआर एनर्जी लि. (TPP) ते ४०० के.व्ही. वरोरा उपकेंद्रापर्यंत दुहेरी परिपथ वाहिनीची दुहेरी परिपथ मनोऱ्यावर उभारणी करणे – १२ कि.मी.	बी.आर क्र.१११/०९ दि.२७.०९.२०१६
१७	धुळे जिल्ह्यातील ४००/२२० के.व्ही. जीआयएस पुलींग उपकेंद्राची शिवाजीनगर (बलसाने) येथे उभारणी करणे.	**(i)** ४०० के.व्ही. धुळे उपकेंद्र ते ४०० के.व्ही. सरदार सरोवर उपकेंद्र या ४०० के.व्ही. वाहिनीवरील एका परिपथावर ४०० के.व्ही. शिवाजीनगरसाठी LILO व OPGW आणि Twin Conductor उभारणी करणे – १८ कि.मी. **(ii)** २२० के.व्ही. शिवाजीनगर उपकेंद्र ते प्रस्तावित ४०० के.व्ही. जी.आय.एस. पूलिंग शिवाजीनगर उपकेंद्रापर्यंत २२० के.व्ही. द्विपथ वाहिनीची दुहेरी परिपथ मनोऱ्यावर उभारणी करणे व OPGW आणि Twin Conductor ची उभारणी करणे – १८ कि.मी.**(iii)** २२० के.व्ही. धुळे उपकेंद्र ते २२० के.व्ही. दोंडाईचा (अस्तित्वात असलेले) उपकेंद्र या एकेरी परिपथ वाहिनीवर ४०० के.व्ही. जी.आय.एस. पूलिंग शिवाजीनगर उपकेंद्रासाठी लिलो करणे व OPGW आणि Twin Conductor ची उभारणी करणे- १५ कि.मी.	बी.आर क्र.१११/११ दि.२७.०९.२०१६

Bhimashankar Yallappa Manta

(भि.य. मंता)

उप सचिव, महाराष्ट्र शासन

आदेश क्रमांक: पावामा-२०१७/प्र.क्र.१५६/ऊर्जा-४ दिनांक १२.०४.२०१८ सोबतचे विवरणपत्र

परिशिष्ट - ब

महापारेषण कंपनीने सह वीज निर्मिती, जलविद्युत,पवनउर्जा इत्यादी योजनेअंतर्गत मंजूर केलेले प्रकल्प

अ.क्र.	योजनेचा तपशील	योजनेअंतर्गत असलेल्या वाहिन्यांचा तपशील	मान्यता क्र. व दिनांक
१	मे. ग्रीनराज सोलर एनर्जी प्रा. लि. म्हसाळे, ता. साक्री, जि. धुळे यांच्या १०० मे.वॅ. सौरऊर्जा वीज प्रकल्पाची १३२ के.व्ही. वर निष्कासन व्यवस्था करणे.	१३२/३३ के.व्ही. म्हसाळे सोलर पार्क उपकेंद्र उभारणे (ii) १३२ के.व्ही. द्विदल परिपथ वाहिनी दुहेरी मनोऱ्यावर २२०/१३२/३३ के.व्ही. शिवाजीनगर उपकेंद्रापासून मे. ग्रीनराज सोलर एनर्जी प्रा. लि. यांच्या १३२/३३ के.व्ही. म्हसाळे सोलरपार्क उपकेंद्रापर्यंत उभारणे— १० कि.मी.	CMD/MSETCL/१४८२ दि. २६.१२.२०१६
२	मेसर्स गोकुळ माऊली शुगर लि. तडवळ, ता. अक्कलकोट, जि. सोलापूर यांच्या १४.८५ मे.वॅ. उसाच्या चिपाडावर (बगॅस) आधारित वीज निर्मिती प्रकल्पातून होणाऱ्या विजेचे निष्कासन करणे.	१३२ के.व्ही. एकल परिपथ वाहिनी दुहेरी मनोऱ्यावर १३२ के.व्ही. करजगी उपकेंद्रापासून मेसर्स गोकुळ माऊली शुगर लि. यांच्या आवारापर्यंत उभारणे— ८.५ कि.मी.	Dir(Proj)/MSETCL/१९६ दि. ३१.०१.२०१७

Bhimashankar Yallappa Manta

Digitally signed by Bhimashankar Yallappa Manta
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Industries,Energy And Labour Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=873ce9a279d9561ff0cbf658e05b823c67c79dcac309fc4ebdac035d6aeec2a0, cn=Bhimashankar Yallappa Manta
Date: 2018.04.12 12:50:58 +05'30'

(भि.य. मंता)

उप सचिव, महाराष्ट्र शासन

आदेश क्रमांक: पावामा-२०१७/प्र.क्र.१५६/ऊर्जा-४ दिनांक १२.०४.२०१८ सोबतचे विवरणपत्र

परिशिष्ट – क

महापारेषण कंपनीने समर्पित वितरण सुविधा (डी.डी.एफ.) अंतर्गत मंजूर केलेले प्रकल्प

अ.क्र.	योजनेचा तपशील	योजनेअंतर्गत असलेल्या वाहिन्यांचा तपशील	मान्यता क्र. व दि.
१	समर्पित वितरण सुविधा योजने अंतर्गत मे. रेल्वे इलेक्ट्रीफिकेशन सिकंदराबाद (RES) यांना, गोंदिया बल्लारशहा रेल्वे मार्गाच्या विद्युतिकरणाकरिता प्रस्तावित मूलमरोरा, नागबीड आणि हिरडमल्ली येथे रेल्वे कर्षण उपकेंद्राकरिता ४ एम.व्ही.ए. वीज पुरवठा १३२ के.व्ही. क्षमतेवर करणेबाबत.	१३२ के.व्ही. मूलमरोरा रेल्वे कर्षण उपकेंद्र १३२ के.व्ही. एकल परिपथ वाहिनी दुहेरी मनोऱ्यावर म.रा.वि.पा.कं.मर्या.च्या १३२ के.व्ही. मूल उपकेंद्रापासून मूलमरोरा रेल्वे कर्षण उपकेंद्रापर्यंत उभारणे – १० कि.मी. १३२ के.व्ही. नागबीड रेल्वे कर्षण उपकेंद्र १३२ के.व्ही. एकल परिपथ वाहिनी दुहेरी मनोऱ्यावर म.रा.वि.पा.कं.मर्या. च्या १३२ के.व्ही. ब्रम्हपुरी उपकेंद्रापासून नागबीड रेल्वे कर्षण उपकेंद्रापर्यंत उभारणे – २० कि.मी. १३२ के.व्ही. हिरडमल्ली रेल्वे कर्षण उपकेंद्र १३२ के.व्ही. एकल परिपथ वाहिनी दुहेरी मनोऱ्यावर म.रा.वि.पा.कं.मर्या. च्या १३२ के.व्ही. गोंदिया उपकेंद्रापासून हिरडमल्ली रेल्वे कर्षण उपकेंद्रापर्यंत उभारणे – १३.५ कि.मी.	११३८ दि. २९.०९.२०१६
२	समर्पित वितरण सुविधा योजने अंतर्गत मे. सेंट्रल रेल्वे भुसावळ यांना प्रस्तावित वरुड आणि चांदूरबाजार रेल्वे कर्षण उपकेंद्राकरिता ५ एम.व्ही.ए. वीज पुरवठा १३२ के.व्ही. क्षमतेवर करणेबाबत.	१३२ के.व्ही. वरुड रेल्वे कर्षण उपकेंद्र १३२ के.व्ही. एकल परिपथ वाहिनी दुहेरी मनोऱ्यावर म.रा.वि.पा.कं.मर्या. च्या २२०/१३२ के.व्ही. वरुड उपकेंद्रापासून वरुड रेल्वे कर्षण उपकेंद्रापर्यंत उभारणे – ८ कि.मी. १३२ के.व्ही. चांदूरबाजार रेल्वे कर्षण उपकेंद्र १३२ के.व्ही. एकल परिपथ वाहिनी दुहेरी मनोऱ्यावर म.रा.वि.पा.कं.मर्या. च्या १३२ के.व्ही. चांदूरबाजार उपकेंद्रापासून चांदूरबाजार रेल्वे कर्षण उपकेंद्रापर्यंत उभारणे – ३ कि.मी.	१३८२ दि. २१.११.२०१६

Bhimashankar Yallappa Manta

Digitally signed by Bhimashankar Yallappa Manta
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Industries,Energy And Labour Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=873ce9a279d9561ff0cbf658e05b823c67c79dcac309fc4ebdac035d6aeec2a0, cn=Bhimashankar Yallappa Manta
Date: 2018.04.12 12:51:07 +05'30'

(भि.य. मंता)

उप सचिव, महाराष्ट्र शासन